.nagpur

# NMC e NEWS LETTER

ऑगस्ट २०१९

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/


## थोडक्यात...

### मनपात महापौरांच्या हस्ते ध्वजवंदन

सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार



भारतीय स्वातंत्र्याच्या ७२ व्या वर्धापन दिनानिमित्ताने नागपूर महानगर पालिका मुख्यालयातील हिरवळीवर ध्वजवंदन कार्यक्रम सोहळ्यात त्या बोलत होत्या. मंचावर उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर, मंगळवारी झोन सभापती गार्गी चोपडा, नेहरूनगर झोन सभापती समिता चकोले, सातरंजीपुरा झोन सभापती अभिरुची राजगिरे यांची उपस्थिती होती. यावेळी महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आणि आयुक्त अभिजीत बांगर यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ऐवजदार आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या सत्कार करण्यात आला. महापौरांनी यावेळी अवयवदानाची शपथ उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे संचालन एनएसएससीडीसीएलचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी महेश मोरोणे यांनी केले.

### मनपातर्फे गणेशोत्सव देखावा स्पर्धा

विजेत्या मंडळाला मिळणार १ लाखांचे बक्षीस

नागपूर महानगरपालिका जलप्रदाय विभागाच्या वतीने पाणी संवर्धन व पाणी बचत हा संदेश सार्वजनिक गणेश मंडळाच्या माध्यमातून देण्याकरिता गणेशोत्सव देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जलप्रदाय समिती सभापती विजय (पिंटू) झलके यांनी दिली.नागपूर शहरातील पाण्याची टंचाई लक्षात घेता नागपूर शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून पाण्याच्या बचतीचे व पाण्याच्या संवर्धनाचे संदेश देता यावे, याकरिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेचे विषय १) पाणी पुनर्भरण २) जलाशयाचे प्रदूषणापासून संरक्षण ३) भविष्यातील पिण्याच्या पाण्याची स्थिती व त्याच्या उपाययोजना असा स्वरूपाचे राहणार असून गणेश मंडळाने वरील कोणत्याही एका विषयावरील देखावा तयार करायचा आहे. या स्पर्धेमध्ये पारितोषिक स्वरूपामध्ये प्रथम येणाऱ्यास रूपये १ लाख रूपये, द्वितीय येणाऱ्यास ५१ हजार रूपये, तृतीय क्रमांकास २१ हजार रूपये देण्यात येणार आहे. जे गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहे त्यांनी शिल्ड व प्रमाणपत्र मिळणार आहेत. शहरातील गणेशोत्सव मंडळांनी सहभागी होण्यासाठी आपले नावे संबंधित मनपा झोन कार्यालयात संपर्क साधावा. शहरातील जास्तीत जास्त गणेश मंडळांनी यात सहभागी होण्याचे आवाहन जलप्रदाय समिती सभापती (विजय) पिंटू झलके यांनी केले.

### लहान मुलांच्या कलेला वाव मिळण्याकरिता बालरंगभूमी परिषद उपयुक्त ठरेल

महापौर नंदा जिचकार यांचा विश्वास : बालनाट्य महोत्सवाचे थाटात उद्घाटन

लहान मुलांमध्ये कोणत्याही स्वरूपात काहीतरी कला दडलेली असते. त्यांच्यातील कलेला जर वाव मिळाला तर भविष्यात खूप मोठे यश संपादन करू शकतात. लहान मुलांच्या कलेला वाव मिळण्याकरिता बालरंगभूमी परिषद ही उपायुक्त ठरेल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला. नागपूर महानगरपालिका आणि बालरंगभूमी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर महानगरपालिका आणि बालरंगभूमी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने बालनाट्य महोत्सवाचे आयोजन कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर बालरंगीभूमी परिषदेचे अध्यक्ष मधुरा गडकरी, उपाध्यक्षा आभा मेघे, सीमा फडणवीस, नरेश गडेकर, श्रीकांत गडकरी, नाना मिसाळ, रोशन नंदवंशी प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, सध्याच्या परिस्थितीत लहान मुलांच्या शिक्षणाचा पुढे बोलताना महापौर म्हणाल्या, सध्याच्या परिस्थितीत लहान मुलांच्या शिक्षणाचा अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सततच्या शाळेचे वेळापत्रक व त्यानंतर शिकवणी यातून मुलांना आपल्या कला गुणांना वाव देण्यासाठी फारसा वेळ उपलब्ध नसतो, या अशा प्रकारच्या माध्यमातून लहान मुलांना त्यांच्यातील कला गुणांना वाव मिळण्यासाठी नक्कीच फायदेशीर ठरेल यात काही दुमत नाही. बालरंगभूमी परिषदेतर्फे २५ ऑगस्ट रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी बक्षीस मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. बालनाट्य महोत्सवात अशा एका शनिवारी, झाडी वाली झुंबी, घरटं या तीन नाटकांची प्रस्तुती करण्यात आली.

## उद्यमशीलतेतूनच होईल विदर्भाचा विकास : ना. नितीन गडकरी

### 'इनोव्हेशन पर्व'अंतर्गत 'स्टार्ट अप फेस्ट'चे शानदार उद्घाटन

### मान्यवरांच्या मार्गदर्शनाने युवा संशोधकांना 'स्टार्ट अप बूस्ट'



महापौर नंदा जिचकार यांच्या संकल्पनेतून नागपूर महानगरपालिका, मेयर इनोव्हेशन कौन्सिलच्या वतीने मानकापूर इनडोअर स्टेडियम येथे आयोजित दोन दिवसीय 'इनोव्हेशन पर्व'च्या निमित्ताने 'स्टार्ट अप फेस्ट'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महापौर नंदा जिचकार होत्या. यावेळी व्यासपीठावर विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, आयुक्त अभिजीत बांगर, मंगळवारी झोन सभापती गार्गी चोपडा, कर आकारणी समितीचे उपसभापती तथा ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, अग्निशमन व विद्युत समितीचे उपसभापती निशांत गांधी, सिने कलावंत संदीप कुलकर्णी, अभिनेता भारत गणेशपुरे, गीतकार संदीप नाथ, भारत सरकारच्या एमएचआरडीचे इनोव्हेशन डायरेक्टर मोहित गंभीर, प्रमुख मार्गदर्शक चेत जैन, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, इनोव्हेशन पर्वचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त राजेश मोहिते, मेयर इनोव्हेशन कौन्सिलचे समन्वयक डॉ. प्रशांत कडू, इनोव्हेशन पर्वचे मुख्य समन्वयक केतन मोहितकर, मुकुंद पाटणकर, डॉ. गादेवार, राहुल खराबे, देवेंद्र गायकवाड यांची उपस्थिती होती. तरुणाईला मार्गदर्शन करताना ना. नितीन गडकरी पुढे म्हणाले, आपण सतत नव्याचा शोध घेत असतो. त्यातूनच नागपुरात नव्हे संपूर्ण देशात नवे तंत्रज्ञान विकसित करू शकलो. भारतात सुमारे सात लाख कोटींचे पेट्रोल आणि डिझेल आयात केले जाते. हा खर्च कमी करण्यासाठी आता बायोफ्युएलवर चालणाऱ्या गाड्या आणण्याचा आपला प्रयत्न सुरू आहे. तणस, ऊस, नेपीयर गवत यापासून जैविक इंधन तयार करण्याचे प्रयोग सुरू आहे. इथेनॉलवर चालणारी दुचाकी टीव्हीएस कंपनीने विकसित केली. या दुचाकी प्रत्येक शेतकऱ्यांनी वापरावा असा आपला आग्रह आहे. जैविक इंधन तयार करण्यासाठी आवश्यक तणस, ऊस, नेपियर गवत शेतकऱ्यांनीच निर्माण करावे. ते संपूर्ण आपण विकत घेऊ. त्यापासून जैविक इंधन तयार करू. नवी दिल्ली, हरियाणामधील शेतकऱ्यांना आपण यासाठी प्रोत्साहित केले. २०० कोटी रुपये त्यासाठी दिले. पुढील काही वर्षात तणसापासून बनलेल्या इंधनाचे ३० ते ४० पंप नवी दिल्ली, हरियाणात असतील. यामुळे नवी दिल्लीला प्रदुषणापासून मुक्ती मिळेल. शेतकऱ्यांना काम मिळेल आणि युवांना रोजगार मिळेल. नागपूर परिसरात नेपीयर गवताची निर्मिती करून त्यापासून जैविक इंधन तयार करण्यात येईल. ५० हजार एकरमध्ये हे गवत लावण्यात येईल. या गवताला बायो डायजेस्टरमध्ये टाकून बायो डिझेल तयार करण्यात येईल. विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा या सहा जिल्ह्यांना पुढील सहा वर्षात डिझेलमुक्त करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### मनपाच्या सीएनजी बस प्रात्यक्षिकाला ना.गडकरी व खासदार सनी देओल यांची सदिच्छा भेट



नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने 'आपली बस'चे सीएनजी बसमध्ये परिवर्तन करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या सीएनजी बस प्रात्यक्षिकाला बुधवारी (ता.१४) केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अभिनेते तथा खासदार सनी देओल यांनी सदिच्छा भेट दिली. रेशिमबाग येथील राष्ट्रीय स्वयं सेवक संघाच्या स्मृती मंदिरातील पावन परिसरात हे प्रात्यक्षिक करण्यात आले.यावेळी मनपा परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे, भारतीय जनता पक्षाचे शहर अध्यक्ष व माजी महापौर प्रवीण दटके, विधी समिती सभापती ड. धर्मपाल मेश्राम, नगरसेवक रवींद्र भोयर, नगरसेविका उषा पॅलेट, शीतल कामडे, सहायक आयुक्त (परिवहन) किरण बगडे, प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे, स्थापत्य अभियंता केदार मिश्रा, यांत्रिकी अभियंता योगेश लुंगे, लेखा अधिकारी विनय भारद्वाज, बस ऑपरेटर सदानंद काळकर, रॉमेट मॅनेजर कौस्तुभ गुप्ता आदी उपस्थित होते. परिवहन सेवेतील डिझेल बसेस सी.एन.जी.मध्ये परिवर्तीत करण्याचा पथदर्शी प्रकल्प परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांच्या कार्यकालात सुरू झालेला असून हा देशातील एकमेव यशस्वी प्रयोग ठरलेला आहे.



आयुष मानकर, धनश्री वाटकर, प्रसन्ना नायक

### व्हॉईस ऑफ विदर्भचे विजेते

आयुष मानकर हा मुलांच्या गटातून, धनश्री वाटकर हे युवा गटातून तर प्रसन्ना नायक हे प्रौढ गटातून व्हाईस ऑफ विदर्भ पर्व २ चे विजेते ठरले.नागपूर महानगरपालिका, आई फाऊंडेशन आणि लकी इंटरटेंटमेंट विद्यमाने व्हॉईस ऑफ विदर्भ पर्व २ च्या अंतिम फेरीचे आयोजन रविवारी (ता.१) कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले. यावेळी महापौर नंदा जिचकार, क्रीडा समिती सभापती प्रमोद चिखले, शिक्षण समिती उपसभापती प्रमोद तभाने, समाजसेविका रिचा जैन, प्रिती दास, संयोजक लकी खान उपस्थित होते. वयोगट ३ ते १५ या किशोरवयीन गटातून प्रथम क्रमांक आयुष मानकर, द्वितीय क्रमांक सारिका बोभाटे, तृतीय क्रमांक पूर्वा सहारे यांनी पटकाविला. वयोगट १६ ते ४० युवा गटातून प्रथम क्रमांक धनश्री वाटकर, द्वितीय क्रमांक गौरव सहारे, तृतीय क्रमांक रिदा शेख, वयोगट ४१ च्या वरील गटातून प्रथम क्रमांक प्रसन्ना नायक, द्वितीय गटात अरूण नलगे, तृतीय क्रमांक विजय ढवळे विजयी झाले. किशोरवयीन गटातून अनुश्री केळकर, हर्षद चवरे, श्रावणी खंडारे तर युवा गटातून चेतन आमटे, भाग्यश्री वाटकर आणि प्रौढ गटातून श्याम बापटे, नित्यानंद रेड्डी यांना उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात आली. अंतिम फेरीमध्ये अनिलकुमार खोब्रागडे, यशश्री भावे पाठक, पंकज सिंग, सुनील गजभिये, अंकिता टकले, स्वस्तिका ठाकूर यांनी परीक्षक म्हणून कार्य केले.



### जिजाऊ शोध संस्थान प्रकल्प दर्जात्मक उत्पादनांचे केंद्र होणार :नितीन गडकरी

नागपूर महानगरपालिकेतर्फे व राज्य शासनाच्या निधीमधून तयार होणारे 'जिजाऊ शोध संस्थान' महिला उद्योजिका भवन प्रकल्प हे नागपूर शहरातील बचत गटांना उद्योगाद्वारे बळ देणारे ठरणार आहे. या प्रकल्पाद्वारे महिलांना उद्योगाचे प्रशिक्षण देउन त्यांच्याद्वारे निर्मित उत्पादनांना बाजार उपलब्ध करुन देण्याची सुद्धा गरज आहे. महिलांमध्ये प्रचंड क्षमता आहे. कोणतेही कार्य अतिशय बारकाईने करण्याची कला महिलांमध्ये आहे. त्यामुळे कोणतेही उत्पादन तयार करताना त्याचा दर्जा, पॅकेजींग व मार्केटिंग याकडे विशेष लक्ष देउन योग्य कार्य केल्यास मनपाचा हा पथदर्शी प्रकल्प दर्जात्मक उत्पादनांचे केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे वित्त आणि नियोजन, वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, राज्याचे ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्य उत्पादन शुल्क तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम वन, आदिवासी विकास राज्यमंत्री डॉ. परिणय फुके, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, महापौर नंदा जिचकार, आदी उपस्थित होते.

### स्वयंरोजगाराद्वारे पर्यावरण व आरोग्याबाबत जनजागृती

महालक्ष्मी महिला बचत गटाचा पथदर्शी उपक्रम

नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागाद्वारे महिला बचत गटांच्या अडचणी दूर करुन त्यांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक मदत केली जाते. मनपाच्या या योजनेचा लाभ घेत शहरातील महालक्ष्मी महिला बचत गटाने स्वयंरोजगाराच्या माध्यमातून पर्यावरण व आरोग्याबाबत जनजागृतीचे कार्य हाती घेतले आहे. नुकतेच मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात आयोजित 'इनोव्हेशन पर्व'मध्ये लावण्यात आलेल्या स्टॉलची मनपा अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख यांनी पाहणी केली व उपक्रमाचे कौतुक केले. भरभरून देणा–या निसर्गातून काही निर्माण करण्याच्या विचारातून जैविक खताची संकल्पना मांडली व त्यावर अंमलबजावणीही सुरू केली. आज महालक्ष्मी महिला बचत गटाद्वारे जैविक खत, गुलाब खत, बुरशी खत तयार करण्यात येत आहे. विशेष म्हणजे बचत गटातील महिलांनी या खत निर्मितीची सुरूवात आधी स्वत:च्या घरातूनच केली. तयार करण्यात आलेल्या जैविक खताचे प्रयोग घरातीलच रोपट्यांवर केले. यानंतर मिळालेल्या निकालातून मनपाच्या महिला उद्योजिकता मेळाव्याद्वारे मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली. जमिनीमध्ये मिसळून जास्तीत जास्त गांडूळ निर्मिती करण्याचे कार्य जैविक खत तयार करते त्यामुळे त्याचा प्रभाव अधिक काळ असतो. या खताच्या वापराचा मानवी शरीरावर कोणतेही दुष्परिणाम पडत नाही तसेच हे खत कितीही वर्षानंतर वापरत येउ शकते. शेण खत, गांडूळ खत, निम खत, कुजलेला पाला, निंबोळी, बकरी खत आदींपासून जैविक खत तयार करण्यात येते.

## नागपूर शहरात प्रत्येक सिग्नलवर होणार 'रेन वाटर हार्वेस्टिंग': महापौर नंदा जिचकार

### मनपाचा पथदर्शी प्रकल्प : आग्याराम देवी चौकातील सिग्नलवर पहिल्या प्रकल्पाचे भूमिपूजन



मार्च महिन्यात झालेल्या 'मेयर इनोव्हेशन अवार्ड'मध्ये विजयी ठरलेल्या 'सिग्नल आयलँड' या संकल्पनेचा उपयोग करुन शहरातील सिग्नलवर 'रेन वाटर हार्वेस्टिंग' करण्याच्या प्रकल्पाची अंमलबजावणी नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. नागपूर महानगरपालिकेचा हा पथदर्शी प्रकल्प असून 'ट्रू ग्रीन एनर्जी'च्या माध्यमातून शहरातील संपूर्ण सिग्नल, महामार्ग व अन्य ठिकाणी हा प्रकल्प राबविण्यात येणार असून शहरातील प्रत्येक सिग्लवर 'रेन वाटर हार्वेस्टिंग' करण्यात येईल, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.संपूर्ण शहरात राबविण्यात येणा–या या प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून 'सिग्नल आयलँड'च्या पायलट प्रकल्पाचे गुरूवारी (ता.२२) आग्याराम देवी चौकातील सिग्नलवर महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, जलप्रदाय समिती सभापती विजय (पिंटू) झलके, क्रीडा समिती सभापती प्रमोद चिखले, धंतोली झोन सभापती लता काडगाये, जलप्रदाय समिती उपसभापती भगवान मेंढे, आरोग्य समिती उपसभापती नागेश सहारे, प्रतोद दिव्या धुरडे, सत्तापक्ष उपनेत्या वर्षा ठाकरे, नगरसेविका चेतना टांक, नगरसेविका हर्षला साबळे, नगरसेवक राजेंद्र सोनकुसरे, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) मनोज गणवीर, 'ट्रू ग्रीन एनर्जी'चे अमित सरकार, मंगेश मेढेकर, गजानन आखरे, राजू गुहे, दिगंबर आमदरे, अश्वजीत गाणार, हेमंत वाघ, लिकेश पटेल आदी उपस्थित होते. प्रारंभी महापौर नंदा जिचकार व अन्य मान्यवरांनी आग्याराम देवी चौकातील सिग्नलवर प्रकल्पाचे भूमिपूजन केले. यावेळी महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, भविष्यातील पाणी टंचाई लक्षात घेता शहरातील शासकीय, निमशासकीय व खासगी मोठ्या इमारतींमध्ये 'रेन वाटर हार्वेस्टिंग' आवश्यक असल्याचा व त्यादृष्टीने अंमलबजावणी करण्याचा निर्णय महानगरपालिकेमध्ये घेण्यात आला. पावसाच्या पाण्याचे संकलन करून ते जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविण्याच्या प्रकल्पाची अंमलबजावणी नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्येही करण्यात आली आहे. शहरतील रस्ते, महामार्ग आदी ठिकाणी पावसाचे पाणी थांबविण्याची अथवा ते जमिनीत मुरविण्याची कोणतिही व्यवस्था आपल्याकडे नाही. शहरातील महत्वाच्या समस्यांसाठी उपयुक्त ठरणा–या नवसंकल्पना 'मेयर इनोव्हेशन अवार्ड'मध्ये मांडण्यात आल्या होत्या. त्यातूनच 'सिग्नल आयलँड' ही संकल्पना पुढे आली. रस्ते, महामार्गावरुन वाहणा–या पाण्याचे संवर्धन करण्यासाठी हा प्रकल्प पथदर्शी ठरणार आहे, असा विश्वासही महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.

# थोडक्यात...

## मैदानांच्या नूतनीकरण कामाचे महापौरांच्या हस्ते भूमिपूजन



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निधीतून प्रस्तावित प्रभाग ३५ मधील विविध १५ मैदानांच्या नूतनीकरण कामाचे गुरूवारी (ता.२९) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. यावेळी ओबीसी महामंडळाचे उपाध्यक्ष अविनाश ठाकरे, नगरसेविका विशाखा मोहोड, नगरसेविका जयश्री वाडीभस्मे, नगरसेवक संदीप गवई, संजय खोरगडे, आसावरी कोठीवान, संजय पौनीकर, बिट्टू चव्हाण, मनिष देहाडराय, रूपेश चावरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निधीमधून दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदार संघातील मैदानाच्या नूतनीकरणासाठी १५ कोटी रुपये निधी मंजुर करण्यात आला. या निधीतून प्रभाग ३५ मधील सर्वाधिक १५ मैदानांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. प्रभाग ३५ मधील म्हाडा कॉलनी, स्वामी स्वरूपानंद, सप्तगौरी, फेन्ड्स, अमर संजय सोसायटी, सुरेश गृह निर्माण, दत्तात्रय सोसायटी, अभिनव गृहनिर्माण, पायल पल्लवी, जयहिंद सोसायटी, भारती गृहनिर्माण, आरटीओ सोसायटी, गुरूछाया सोसायटी, डिव्हीजनल को-ऑपरेटीव्ह सोसायटी या मैदानांचे नूतकरणीकरण करण्यात येणार आहे.

## लाल शाळेच्या परिसरात बनणार अत्याधुनिक 'ई-लायब्ररी'

### लवकरच होणार भूमिपूजन : दयाशंकर तिवारी यांचा पुढाकार

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील सेंट्रल एव्हेन्यू मार्गावरील गीतांजली चौकातील लाल शाळेच्या परिसरामध्ये भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अत्याधुनिक 'ई-लायब्ररी' तयार करण्यात येणार आहे. मनपाद्वारे तयार करण्यात येणारी ही 'ई-लायब्ररी' ब्रिटीश 'ई-लायब्ररी'च्या संकल्पनेवर आधारित असून यासाठी पाच कोटी रुपये निधी प्रस्तावित करण्यात आले आहे. 'ई-लायब्ररी'च्या कामाचे लवकरच भूमिपूजन करण्यात येणार असून यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे, अशी माहिती ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी दिली.अत्याधुनिक 'ई-लायब्ररी'ची तीन मजली इमारत राहणार असून येथे तळमजल्यावर पार्कींगची व्यवस्था, पहिल्या माळ्यावर १२५ विद्यार्थ्यांसाठी प्रेझेंटेशन, सेमिनार, कार्यशाळा यादृष्टीने वातानुकुलित सभागृहाचे निर्माण करण्यात येणार आहे. बाहेरगावावरुन येणा-या विद्यार्थ्यांना अभ्यासात सुविधा व्हावी यासाठी त्यांच्या सामानाची व्यवस्थित काळजी घेतली जावी यासाठी याच माळ्यावर एक क्लॉक रुम तयार करण्यात येणार आहे. याशिवाय अत्याधुनिक 'ई-लायब्ररी'च्या व्यवस्थापन कार्यालयाचीही व्यवस्था याच माळ्यावर करण्यात येईल. दुस-या माळ्यावर २५ विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी २५ संगणक संच व २४ तास इंटरनेट सुविधा करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासात 'ग्रुप डिस्कशन'साठी चार विद्यार्थी क्षमतेच्या वेगळ्या तीन कॅबिनची व्यवस्था करण्यात येणार आहे. याशिवाय पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनसाठी वेगळे कक्ष तयार करण्यात येणार आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह, रिफ्रेशमेंटसाठी पँट्री व किंमती वस्तूंच्या संरक्षणाच्या दृष्टीने लॉकर आदी व्यवस्थाही अत्याधुनिक 'ई-लायब्ररी'मध्ये प्रस्तावित आहे. दुस-या माळ्यावरील सुविधेप्रमाणे तिस-या माळ्यावरही सर्व सुविधा करण्यात येईल.

'ई-लायब्ररी'ची संपूर्ण इमारत 'ग्रीन बिल्डींग' राहणार असून इमारतीच्या छतावर सौर उर्जा पॅनल लावण्यात येणार आहे. संपूर्ण इमारत वातानुकुलित राहणार असून विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क घेउन त्यांना अभ्यासासाठी अत्याधुनिक सुविधा पुरविण्यात येईल



## नवसंकल्पनांना मनपा देईल पाठबळ : महापौर नंदा जिचकार



महापौरपदाच्या कार्यकाळात आपण ज्येष्ठ विरंगुळा केंद्र, विद्यार्थ्यांसाठी निरनिराळे कार्यक्रम, महिलांसाठी महिला उद्योजिका केंद्र आणि तरूणाईसाठी इनोव्हेशन पर्व असे उपक्रम राबविले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यामुळे असे कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. युवांच्या संकल्पनांसाठी आकाश मोकळे करण्याचा मनपाचा हेतू आहे. याच व्यासपीठावर बँकांना आणून त्यांच्या माध्यमातून स्टार्ट अप साठी अर्थसहाय्य मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. व्यक्तीची दिशा चुकली तर त्याला पुढचा प्रवास महागात पडतो. शासनाच्या प्रत्येक योजना दिशादर्शक आहेत. मुलांना दिशा दाखविण्याचे कार्य शासन करीत आहे. स्वत:चे मूल्य वाढवा. ज्याच्या अंगी धाडस आहे, ज्ञान आहे आणि व्यवहारचातुर्य आहे तो कधीच मागे राहू शकत नाही. सृजनशीलतेला जागं करा. नवसंकल्पनांना नागपूर महानगरपालिका पाठबळ देईल. नागपूर शहराला ग्लोबल सिटी बनविण्यासाठी आपले सहकार्य द्या, असे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.

## 'एकलव्य' योजनेद्वारे ५० रुपयात दिवसभर प्रवास

'आपली बस' सेवेमध्ये पुन्हा एका नव्या योजनेद्वारे नागरिकांना सुविधा प्रदान करण्यात येणार आहे. शहरात विविध कामांसाठी दिवसभर 'आपली बस'ने फिरणा-यांना आता अतिरिक्त पैसे मोजावे लागणार नाही. मनपा परिवहन विभागाच्या 'एकलव्य' योजनेद्वारे एकदा ५० रुपयाची पास काढल्यानंतर दिवसभर शहरात कोणत्याही भागामध्ये 'आपली बस'ने प्रवास करता येणार आहे, असेही परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी यावेळी सांगितले.

# शहरातून आंतरराष्ट्रीय खेळाडू पुढे येतील महापौर नंदा जिचकार यांचा विश्वास

### आई कुसुम सहारे स्मृती विदर्भस्तरीय फुटबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन गतविजेत्या नवरंग क्रीडामंडळाची विजयी सलामी



आज नागपूर शहरात विकास कामांसह सर्वत्र क्रीडा वातावरण निर्मिती होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या खासदार क्रीडा महोत्सवामुळे त्यात अधिक भर घातली गेली आहे. नागपूर महानगरपालिका आणि आई कुसूम सहारे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भस्तरीय फुटबॉल स्पर्धा मागील अनेक वर्षांपासून विदर्भातील प्रतिभावंत खेळाडूंना महत्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य करीत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक खेळाडूंनी आपला ठसा उमटविला आहे. फुटबॉल स्पर्धेच्या माध्यमातून विदर्भातील खेळाडूंना मोठी संधी निर्माण करून देण्याचे कार्य आयोजक आरोग्य समितीचे उपसभापती नगरसेवक नागेश सहारे यांच्यामार्फत होत आहे. हे कार्य पुढेही असेच सुरू राहिल्यास लवकरच विदर्भासह आपल्या नागपूर शहरातून अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू पुढे येतील, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला. नागपूर महानगरपालिका आणि आई कुसूम सहारे फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १५वी आई कुसूम सहारे स्मृती विदर्भास्तरीय फुटबॉल स्पर्धेचे गुरुवारी (ता.१) रेशीमबाग मैदानावर महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांनी फुटबॉलला किक मारुन स्पर्धेचे उद्घाटन केले. स्पर्धेचा उद्घाटन सामना गतवर्षीचा विजेता संघ नवरंग क्रीडा मंडळ (अजनी) व उपविजेता हिलटॉप क्रीडा मंडळ (सेमीनरी हिल्स) यांच्यात झाला. सामन्यापूर्वी महापौर नंदा जिचकार यांनी उभय संघाच्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेमध्ये गतविजेत्या नवरंग क्रीडा मंडळ (अजनी) संघाने हिलटॉप क्रीडा मंडळ (सेमीनरी हिल्स) संघाचा पराभव करुन विजयी सलामी दिली.

## महिला नगरसेविकांना मिळणार चारचाकी गाडी चालविण्याचे प्रशिक्षण

### महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गिऱ्हे यांची माहिती

नागपूर महानगरपालिकेतील सर्व महिला नगरसेविकांना चारचाकी गाडी चालविण्याचे प्रशिक्षण मिळणार असल्याची माहिती महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गिऱ्हे यांनी दिली. मंगळवारी महिला व बालकल्याण समितीची आढावा बैठक मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित कऱण्यात आली होती. त्याप्रसंगी त्यांनी ही माहिती दिली.यावेळी बैठकीला उपसभापती दिव्या धुरडे, समिती सदस्य विशाखा मोहोड, मनिषा अतकरे, नेहा निकोसे, उपायुक्त रंजना लाडे प्रामुख्याने उपस्थित होते.महापालिकेच्या सर्व झोनमध्ये महिला बचत गटाच्या माध्यमातून फुड स्टॉल व कॅन्टीन तयार करण्याबाबत यावेळी बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. सर्व झोनचे सहायक आयुक्तांना पत्र पाठवून जागा निश्चित करण्यासाठी सांगण्यात यावे, असे निर्देश सभापती संगीता गिऱ्हे यांनी दिले. समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या रात्र निवारा केंद्राबाबत आढावाही सभापती संगीता गिऱ्हे यांनी घेतला. विभागामार्फत ८ रात्र निवारा केंद्र सुरू असून रात्र निवारा केंद्राला सदस्यांनी एक दिवस भेट देण्यासंदर्भात यावेळी चर्चा झाली. महिला व बालकल्याण समितीमार्फत आयोजित कऱण्यात येणाऱ्या महिला उद्योजिका मेळाव्याच्या आयोजनासंदर्भातही यावेळी बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. विभागामार्फत ई-रिक्षा वाटप व लाडली लक्ष्मी योजनेची माहिती व सविस्तर आढावा सभापती संगीता गिऱ्हे यांनी अधिकाऱ्यांमार्फत जाणून घेतला. महिला व बालकल्याण समिती सदस्यांचा अभ्यासदौरा आयोजित करण्यासंदर्भात बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. पुढील आठ दिवसात अभ्यासदौऱ्याचे स्थान व प्रारुप निश्चित कऱण्याचे निर्देश सभापती संगीता गिऱ्हे यांनी दिले.



## अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असणार मनपाचे नगरभवन

### पर्यावरणपूरक इमारतीच्या बांधकामाबाबत प्रक्रिया पूर्ण करा: माजी महापौर प्रवीण दटके यांचे निर्देश

नागपूर महानगरपालिकेचे महाल येथील राजे रघुजी भोसले नगरभवन पुरातन स्मृती जपतानांचा अत्याधुनिक होणार आहे. सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण व पर्यावरणपूरक असलेल्या राजे रघुजी भोसले नगरभवनचे संकल्पचित्र व त्याचा आराखडा मंगळवारी (ता.२७) माजी महापौर प्रवीण दटके यांच्या समक्ष सादर करण्यात आला. पार्कींग, पदाधिकारी व अधिकारी यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था, कॅन्टींन, डायनिंग सभागृह, अत्याधुनिक उपकरणे व संपूर्ण सौर उर्जेवर संचालित इमारत शहराच्या सौंदर्यात भर घालणारी ठरणार आहे. या इमारतीच्या बांधकामाबाबत आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन पुढील कार्यवाही करा, असे निर्देश माजी महापौर प्रवीण दटके यांनी दिले. मनपाच्या प्रस्तावित व अपूर्ण असलेल्या बी.ओ.टी. पी.पी.पी., केंद्र व राज्य सरकारकडे प्रलंबित प्रकल्पांना गती देण्यासाठी महापौरांद्वारे प्रवीण दटके यांच्या अध्यक्षतेत गठीत समितीची बैठक मंगळवारी (ता.२७) मनपाच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी राजे रघुजी भोसले नगरभवनच्या प्रस्तावित नवीन इमारतीच्या आराखड्यासह ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्प, सोक्ता भवन, सेंट्रल मॉल, जिजाउ शोध संस्थान, साने गुरूजी हायस्कूल यांच्या कार्याचाही समिती अध्यक्ष माजी महापौर प्रवीण दटके यांनी आढावा घेतला.




## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मनपातर्फे मेजर ध्यानचंद यांना अभिवादन

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांची जयंती संपूर्ण देशात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरे करण्यात येते. गुरूवारी (ता.२९) नागपूर महानगरपालिकेमध्येही क्रीडा दिन साजरा करण्यात आला. मनपा क्रीडा विशेष समिती सभापतींच्या कक्षामध्ये हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला महापौर नंदा जिचकार यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी क्रीडा विशेष समिती सभापती प्रमोद चिखले, शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे, महिला व बालकल्याण समिती सभापती संगीता गि-हे, क्रीडा समिती उपसभापती मनिषा कोठे, शिक्षण समिती उपसभापती प्रमोद तभाने, धंतोली झोन सभापती लता काडगाये, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेविका रूपा रॉय, नगरसेविका स्नेहल बिहारे, नगरसेवक नागेश मानकर, नगरसेवक संजय बुर्रेवार, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी, जितेंद्र गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, मेजर ध्यानचंद यांनी आपल्या कर्तृत्त्वाच्या बळावर सलग तीनदा ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक पटकावून जगाला चकीत केले. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटणारी ही घटना आहे. हॉकीसारख्या राष्ट्रीय खेळाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन मेजर ध्यानचंद यांच्यामुळे देशाला मिळाला. आज नागपूर शहरामध्ये क्रीडा वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वस्तरातून प्रयत्न होत आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खासदार क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून उदयोन्मुख खेळाडूंसाठी नवे दालन खुले केले आहे. त्यांच्याच पुढाकाराने शहरातील क्रीडा मैदानांचा विकास करुन शहरातील खेळाडूंसाठी सुविधा उपलब्ध करुन दिली जात आहे. आपल्या नागपूर महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. याशिवाय मनपाच्या शाळांचे विद्यार्थीही विविध स्पर्धांमध्ये ठसा उमटवित आहेत. शहरातून पुढेही प्रतिभावंत खेळाडू पुढे यावेत यासाठी क्रीडा समितीतर्फे कार्य सुरूच राहावेत, अशी अपेक्षाही महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन क्रीडा विशेष समिती सभापती प्रमोद चिखले यांनी केले.

## नागपुरात मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढले

### एक हजार मुलांमागे ९६८ मुली : पीसीपीएनडीटी बैठकीत माहिती सादर



नागपूर महानगरपालिकेतर्फे लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी वेळोवेळी करण्यात आलेल्या जनजागृती अभियानाला यश येत असल्याचे दिसून येत आहे. २०११च्या जनगणनेच्या तुलनेत जानेवारी ते जुलै २०१९ या कालावधीमध्ये नागपूर शहरातील मुलींच्या जन्मदाराचे प्रमाण वाढले आहे. बैठकीत मनपा आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे, सदर रोग निदान केंद्राच्या डॉ. शिल्पा जिचकार, डॉ. अजुंम बेग, कल्पना वानखेडे, प्रदीप कुंभारे यांच्यासह सर्व डॉक्टर्स, नर्स, आशा सेविका, टी.बी. कर्मचारी आदी उपस्थित होते.मुलींचे जन्मदर कमी होण्यामागे समाजातील मानसिकता जबाबदार आहे. शहरात लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी जनजागृती केली जाते. सर्व डॉक्टर्सचे प्रशिक्षणही घेण्यात येते. याशिवाय सोनोग्रॉफी करणा-या डॉक्टर्सचेही प्रबोधन करण्यात येते. त्याचेच फलित म्हणून शहरात मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. २०११च्या जनगणनेनुसार एक हजार मुलींमागे ९२६ एवढे मुलींचे प्रमाण होते तर जानेवारी २०१९ ते जुलै २०१९ या कालावधीमध्ये एक हजार मुलींमागे ९६८ एवढे जन्मदराचे प्रमाण असल्याचे निदर्शनास आले आहे, अशी माहिती बैठकीमध्ये देण्यात आली.यावेळी आरोग्य उपसंचालक डॉ. भावना सोनकुसळे म्हणाल्या, शहरामध्ये पीसीपीएनडीटी नियमांचे व्यवस्थित पालन केले जाते. शिवाय मनपाच्या डॉक्टर्सतर्फे दर तीन महिन्यांनी शहरातील ६३० सोनाग्रॉफी केंद्राला भेट देउन तपासणीही केली जाते,

## मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना दहा लाख रुपये किंमतीच्या सायकलींचे वाटप

### मनपाची सायकल बँक योजना : शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे यांचा पुढाकार



नागपूर महानगरपालिकेच्या सायकल बँक योजनेंतर्गत सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे यांच्या पुढाकाराने मंगळवारी (ता.२०) मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना दहा लाख रुपये किंमतीच्या सायकल वाटप या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.विवेकानंद नगर हिंदी माध्यमिक शाळेमध्ये आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष ओमप्रकाश (मुन्ना) यादव होते. मंचावर सत्तापक्ष नेते व महाराष्ट्र राज्य लघु विकास मंडळाचे अध्यक्ष संदीप जोशी यांच्यासह माजी महापौर प्रवीण दटके, शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे, उपसभापती प्रमोद तभाने, क्रीडा समिती उपसभापती मनिषा कोठे, शिक्षण समिती सदस्या रिता मुळे, सुषमा चौधरी, प्रमिला मथरानी, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, क्रीडा निरीक्षक नरेश चौधरी आदी उपस्थित होते.नागपूर महानगरपालिकेतर्फे मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश, स्वेटर, जोडे आदी साहित्य प्रदान करण्यात येतात. आता सायकल प्रदान करुन सुविधेमध्ये भर घालण्यात आली आहे. मनपामध्ये आधी शिक्षण विभागाकडे नेहमी दुर्लक्ष केले जायचे. मात्र मागील दोन वर्षात शिक्षण समिती सभापती प्रा.दिलीप दिवे यांनी पुढाकार घेउन आयुक्त राम जोशी यांच्या सहकार्याने मनपा शाळा व विद्यार्थ्यांसाठी अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविण्याचे काम केले आहे. मनपाच्या शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी बरी नसते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्याचे कार्य विभागाकडून केले जात आहे, ही स्तुत्य बाब आहे. या योजनांचा लाभ घेताना विद्यार्थ्यांनीही आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवून अभ्यास करावा. शिक्षण हे मोठे शस्त्र आहे त्याचा योग्य लाभ घेउन मेहनतीच्या बळावर आई-वडीलांना परिस्थितीमधून बाहेर काढा, असे आवाहन प्रतिपादन मनपातील सत्तापक्ष नेते व महाराष्ट्र राज्य लघु विकास मंडळाचे अध्यक्ष संदीप जोशी यांनी यावेळी केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांनी अनेक व्यक्तींचे उदाहरण देउन इच्छाशक्ती आणि मेहनतीच्या बळावर मोठे झालेल्या जगप्रसिद्ध व्यक्तींची गोष्ट सांगितली.महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष ओमप्रकाश (मुन्ना) यादव म्हणाले, मनपा शाळा आणि तेथील विद्यार्थी यांच्याकडे कधीही लक्ष देण्यात आले नाही. शाळा आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कोणत्या योजनाही राबविण्यात आल्या नाही. मात्र आताच्या घडीला शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी ही समज खोडून काढली. शहरातील नागरिकांना मिळणा-या भौतिक सुविधांसह मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, ही बाब लक्षात घेउन त्यांनी शाळा आणि विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत.

## सप्टेंबरपासून धावणार महिलांसाठी इलेक्ट्रिकवरील 'तेजस्विनी बस'

### शहीद कुटुंबातील मुलीच्या हस्ते होणार उद्घाटन : चालक, वाहक सर्व कर्मचारी महिलाच

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन समितीद्वारे महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. मनपाच्या 'आपली बस'च्या ताफ्यात महिलांसाठी विशेष इलेक्ट्रिकवर संचालित 'तेजस्विनी बस' लवकरच दाखल होणार असून या बसचे उद्घाटन येत्या सप्टेंबर महिन्यामध्ये करण्याचे प्रस्तावित आहे. विशेष म्हणजे या बस मधील चालक, वाहक व बस आगारातील कर्मचारीही महिलाच राहणार असून शहीद कुटुंबातील मुलीच्या हस्ते पर्यावरणपूरक 'तेजस्विनी बस'चे उद्घाटन करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी दिली. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये सोमवारी (ता.२६) परिवहन समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत समितीचे सदस्य राजेश घोडपागे, नितीन साठवणे, नरेंद्र वालदे, नागेश मानकर, सदस्या रूपा रॉय, वैशाली रोहनकर, मनिषा धावडे, अर्चना पाठक, विशाखा बांते, रुपाली ठाकुर, उपायुक्त राजेश माहिते, परिवहन विभागाच्या सहायक आयुक्त किरण बगडे, निगम सचिव हरीश दुबे, प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे यांच्यासह परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे म्हणाले, 'आपली बस' सेवेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना सुविधा देण्याचा मनपा परिवहन समितीचा प्रयत्न असतो. मागील वर्षी ज्येष्ठ नागरिकांसाठी तिकीटमध्ये ५० टक्के सवलत देण्याची योजना राबविण्यात आली. याच श्रृंखलेमध्ये यावर्षी महिलांसाठी विशेष इलेक्ट्रिकवर संचालित 'तेजस्विनी बस' सुरू करण्यात येत असल्याचे परिवहन समिती सभापती जितेंद्र (बंटी) कुकडे यांनी सांगितले.